Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण ९८ :

# बालमजुरी व मुलांचे हक्क (बाल कामगार प्रतिबंध कायदा)

लहान मुलांचे वय हे खेळण्याचे आणि शिक्षणाचे असते. अशावेळी त्यांना पोटापाण्याच्या उद्योगाला मजुरी करायला लावणे हा गुन्हा आहे. मात्र काही विशिष्ट परिस्थितीत काही विशिष्ट कामे त्यांनी केल्यास त्याला बालमजुरी म्हणत नाहीत. आपण त्यांचे हक्क काय आहेत आणि याबद्दल कायदा काय म्हणतो ते पाहूया


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गन्गोलीया

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवादक : डॉ. चंद्रशेखर दाभाडकर

पुनरावलोकन : डॉ. नरेंद्र नानिवडेकर, श्री. अविनाश शिरगावकर

*Convener:* **Swati Y Bhave**

*Members:* **Prasant Kumar Saboth, Raj Kumar Gupta, SS Kamath**

*Reviewer:* **Joy Bhaduri**




## बालमजुरी व मुलांचे हक्क (बालकामगार प्रतिबंध कायदा)

१. आम्ही आमच्या चार वर्षाच्या मुलाला सांभाळण्याकरता एक १४ वर्षाचा मुलगा कामावर ठेवला आहे. याला बालमजुरी म्हणतात का? आमच्यावर काही कारवाई होऊ शकते का?

२ माझ्या घरी काम करणाऱ्या बाई आठ दिवसाच्या रजेवर जात आहेत. त्यांच्या जागेवर काम करण्यासाठी या बाईंनी त्यांच्या पंधरा वर्षाच्या मुलीला पाठविले आहे. याला बालमजुरी म्हणता येईल का? आम्ही या संदर्भात काय काळजी घ्यावयास हवी?

३ माझ्या घरी काम करणाऱ्या बाईंना पैशांची आवश्यकता आहे. तिच्या बारा वर्षाच्या मुलीला शाळेनंतर मी माझ्या दोन वर्षाच्या बाळाबरोबर खेळण्यासाठी पाठवण्याची विनंती त्यांना करणार आहे. याला बालमजुरी म्हणता येईल का?

४ आमच्या ड्रायव्हरच्या मुलास त्याच्या शाळेची फी भरण्यासाठी आमच्याकडे काम करण्याची इच्छा आहे. त्या ड्रायव्हरने त्या मुलास आमच्याकडे काम देण्याची आम्हाला विनंती केली असून तो किरकोळ कामे उदा: चेक भरणे, बिले भरणे, रविवारची खरेदी, बागकाम इत्यादी किरकोळ कामे करेल असे सांगितले आहे. आम्ही त्यास नोकरीला ठेवावे का?

५ माझ्या ८५ वर्षाच्या वडिलांना संध्याकाळी फिरायला जाताना मदत लागते व आमच्या ड्रायव्हरबरोबर आम्ही त्यांना पार्कमध्ये फिरायला पाठवतो. ड्रायव्हरच्या १५ वर्षाच्या मुलाबरोबर त्यांना फिरायला पाठवतो व त्यासाठी आम्ही त्या मुलाला पैसे देतो. हे बरोबर आहे का?

६ माझ्या घरी काम करणाऱ्या बाई त्यांच्या दहा वर्षाच्या मुलीला शाळेत पाठवत नाहीत. मुलांना शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे व मुलांना शिक्षण देण्याचे महत्त्व – हे मी तिला कसे समजावून सांगू?

७ आम्ही एका हॉटेलमध्ये जेवणास गेलो असताना तेथे एक तेरा चौदा वर्षाचा मुलगा काम करत होता. याबद्दल आम्ही आमची नाराजी व्यक्त करावी का? हा बाल कामगारच असेल ना? आमच्या विरुद्ध काय कारवाई होऊ शकते?

८ आमच्या घरी काम करणाऱ्या बाई तिच्या नऊ–दहा वर्षाच्या मुलीला त्यांच्या बरोबर घरी आणतात व ती मुलगी आईला घर कामात मदत करते. त्या मुलीला बाल कामगार म्हणता येईल का? आम्ही या कामास परवानगी द्यावी का? कृपया सल्ला द्या.

९ आमच्या घरी घर दुरुस्ती / नूतनीकरण करणाऱ्या एका कंत्राटदाराने एका पंधरा वर्षाच्या मुलास काम दिले आहे. त्या व्यक्तीला आमच्या घरी असे काम करण्याची परवानगी देणे म्हणजे बालमजुरीस चालना देणे म्हणता येईल का? कृपया मार्गदर्शन करा.

१० गेल्या काही दिवसात आमच्या परिसरात एक साधारण पंधरा वर्षाचा मुलगा कचऱ्याचे डबे गोळा करण्याचे काम करतो. हा बाल कामगार आहे का आणि आम्ही आमची नाराजी व्यक्त करावी का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

**Core Group**

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# १८

# बालमजुरी व मुलांचे हक्क (बाल कामगार प्रतिबंध कायदा)

**प्रश्न (१)**

**आम्ही आमच्या चार वर्षाच्या मुलाला सांभाळण्याकरता एक १४ वर्षाचा मुलगा कामावर ठेवला आहे. याला बालमजुरी म्हणतात का? आमच्यावर काही कारवाई होऊ शकते का?**

१४ वर्षाखालील कुठल्याही मुलांना नोकरी अथवा घरगुती काम देण्याच्या संदर्भात १९८६ या वर्षी the child and adolescent labour prevention act (बाल आणि किशोरवयीन कामगार प्रतिबंध कायदा) हा कायदा पास करण्यात आला व नंतर इ.स. २०१६ व २०१७ या साली त्या कायद्यात सुधारणा करण्यात आली या सुधारित कायद्याप्रमाणे १४ वर्षाखालील मुलामुलींना आई–वडिलांच्या संमतीनंतरच काही अटींचे पालन करून काम देता येते. उदा: हे काम धोकादायक नसावे, या कामाचा मुलाच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही याची काळजी घ्यावी, वेळेचे बंधन पाळावे, संध्याकाळी सात ते सकाळी आठ या दरम्यान हे काम नसावे, सलग तीन तासांच्या कामानंतर एक तास विश्रांती द्यावी, आठवड्यातून एक दिवस सुट्टी असावी. या सर्व नियमांचे पालन करूनच हे काम द्यावे. या नियमांचे पालन न केल्यास दंडात्मक कारवाई अथवा सहा महिन्याचा तुरुंगवास होऊ शकतो.

वरील प्रश्नांमधील मुलाचे वय १४ वर्षे आहे. त्यामुळे त्याला हा या धोकादायक नसलेल्या कामावर ठेवता येईल. पण जन्माचा दाखला, शाळेचा दाखला इत्यादी प्रमाणपत्रे तपासून बघा आणि या कामाचा त्याच्या शिक्षणावर तर परिणाम होत नाही ना हे पहा. इतकी काळजी घेतली तर तुमच्यावर कुठलीही कारवाई होणार नाही.

प्रश्न (२)

## माझ्या घरी काम करणाऱ्या बाई आठ दिवसांच्या रजेवर जात आहेत. त्यांच्या जागेवर काम करण्यासाठी या बाईंनी त्यांच्या पंधरा वर्षाच्या मुलीला पाठविले आहे. याला बालमजुरी म्हणता येईल का? आम्ही या संदर्भात काय काळजी घ्यावयास हवी?

१४ वर्षावरील किशोरवयीन मुलास किंवा मुलीस कामाला ठेवल्यास त्याला बालमजुरी म्हणता येणार नाही. पण या कामाचा तिच्या शिक्षणावर परिणाम होणार नाही याची काळजीघ्या. त्याबरोबरच वर दिलेला सीएलपीआर (CLPR) हा कायदा सविस्तर जाणून घ्या. आधारकार्ड आणि जन्म दाखल्यावरून तिचे वय निश्चित जाणून घेणे अधिक सुरक्षित! तिच्या सुरक्षिततेची काळजी घ्या आणि तुमच्या कामामुळे तिला कुठली इजा होणार नाही याची आवश्यक ती काळजी घ्या.

या बरोबरच एक सामाजिक जबाबदारी म्हणून बालविवाह प्रतिबंध करणे आपले कर्तव्य आहे. बालविवाहामुळे मुलीच्या शारिरिक वाढीवर व मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. आपण प्रयत्नपूर्वक त्यांची मानसिकता बदलायला हवी आणि त्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगून आर्थिकदृष्ट्या त्या कशा स्वावलंबी होतील या करता प्रयत्न करायला हवेत. घर काम करणाऱ्या बहुतांश स्त्रिया या अशिक्षित असतात. त्याकरता त्यांच्या उत्कर्षाकरता उपयोगी असणाऱ्या अनेक शासकीय योजनांची त्यांना माहिती द्यायला हवी. याबरोबरच बालविवाहाची त्यांची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करावयास हवेत.

प्रश्न (३)

## माझ्या घरी काम करणाऱ्या बाईंना पैशांची आवश्यकता आहे. तिच्या बारा वर्षाच्या मुलीला शाळेनंतर मी माझ्या दोन वर्षाच्या बाळाबरोबर खेळण्यासाठी पाठवण्याची विनंती करणार आहे. याला बालमजुरी म्हणता येईल का?

बालमजुरी कायद्यात सीएलपीआर (CLPR) ॲक्ट २००७ नुसार झालेल्या बदलाप्रमाणे १४ वर्षाच्या खालील मुलीला घरकामास ठेवता येते. पण हे काम हानिकारक नसावे, दोन्ही पालकांची संमती हवी, मुलीच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये, वेळेच्या मर्यादा पाळाव्यात, सलग तीन तासांच्यावर काम असू नये, तीन तासानंतर एक तास विश्रांती हवी, संध्याकाळी सातनंतर व सकाळी आठच्या आधी कामाच्या वेळा नसाव्यात आणि आठवड्यातून एक दिवस सुट्टी द्यावी.

हे मूल बारा वर्षाचे असून पालकांच्या संमतीने मर्यादित वेळेकरता दोन वर्षाच्या बाळाला सांभाळण्यासाठी काम करणार आहे. ही बालमजुरी निश्चितच नाही

तुम्ही तुमच्याकडे काम करणाऱ्या बाईंना (मुलीच्या आईला) तिची शाळा व शिक्षण सुरू ठेवण्याकरता सांगणे आवश्यक आहे. याबरोबरच मुलींच्या उत्कर्षाकरिता असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती द्यावयास हवी. एक सामाजिक कार्य म्हणून तुम्ही या मुलीस शाळेची वह्या, पुस्तके वगैरे द्यावयास हवेत, जेणेकरून पैश्याअभावी तिचे शाळेत जाणे बंद होणार नाही.

**प्रश्न (४)**

**आमच्या ड्रायव्हरच्या मुलाला त्याच्या शाळेची फी भरण्याकरता आमच्याकडे काम करण्याची इच्छा आहे. त्या ड्रायव्हरने त्या मुलाला आमच्याकडे काम देण्याची आम्हाला विनंती केली असून तो चेक भरणे, बिलेभरणे, रविवारची खरेदी, बागकाम इत्यादी किरकोळ कामे करेल असे सांगितले आहे. आम्ही त्याला नोकरीस ठेवावे का?**

हा मुलगा सोळा वर्षाच्यावर असल्यामुळे याला बालमजूर म्हणता येणार नाही आणि तुम्ही त्याला निश्चितपणे कामावर ठेवू शकता. परंतु आधारकार्ड किंवा इतर कागदपत्रांच्या सहाय्याने त्याचे वय तपासून घ्या. त्याच्या काम करण्याच्या निर्णयाची आणि या कामातून शाळेची शुल्क स्वतःहून भरण्याच्या निर्णयाची तुम्ही निश्चित स्तुती करा. पण हे काम त्याच्या शाळेच्या वेळेत नसावे याची काळजी घ्या आणि हे शक्य नसेल तर आणि त्याला पैशाची अत्यंत गरज असेल तर त्याला ओपन स्कूल अथवा रात्र शाळेची माहिती द्या. पण त्याच्या शिक्षणात खंड पडणार नाही याची काळजी घ्या.

त्याला व त्याच्या आईवडिलांना किशोरवयीन मुलांच्या शालेय शिक्षण व आरोग्याबद्दल असणाऱ्या बालमजूर कायद्याची संपूर्ण माहिती द्या. त्याला या मदतीशिवाय शाळेची पुस्तके देणे, गणवेश देणे आणि शिक्षण चालू ठेवण्याकरता प्रोत्साहन देणे हे देखील एक मोठे सामाजिक कार्य होऊ शकते.

**प्रश्न (५)**

**माझ्या ८५ वर्षाच्या वडिलांना संध्याकाळी फिरायला जाताना मदत लागते व आमच्या ड्रायव्हरबरोबर आम्ही त्यांना पार्कमध्ये फिरायला पाठवतो. आता आम्ही ड्रायव्हरच्या १५ वर्षाच्या मुलाबरोबर त्यांना फिरायला पाठवतो व त्याकरता आम्ही त्या मुलाला पैसे देतो. हे बरोबर आहे का?**

या मुलाचे वय १४ वर्षाच्या वर असल्यामुळे हा मुलगा बालकामगार कायद्यात येत नाही. दुसरे असे की हे काम हानिकारक नाही व शाळेच्या वेळेनंतर हे काम असल्यामुळे तुम्ही कायद्याचे उल्लंघन करत नाही. २०१७च्या बालमजुरी कायद्यानुसार संध्याकाळी सातनंतर व सकाळी आठच्या आधी त्याला कामावर ठेवता येत नाही. त्यामुळे वेळेचे बंधन जरूर पाळा.

या मुलाशी आध्यात्मिक आणि मूल्यशिक्षणाबद्दल बागेत फिरताना आठवणीने बोला. हे तुमच्या वडिलांना तुम्ही सांगून ठेवा. कारण हे विषय आजी-आजोबा चांगल्यारीतीने बोलू शकतात. यामुळे या मुलाला केवळ आर्थिक लाभच नाही तर इतर अनेक गोष्टींचा त्याला फायदा होईल किशोरवयीन मुलांना त्यांच्या आयुष्यात एखाद्या विश्वासार्ह प्रौढाची गरज असते जेणेकरून ते त्यांच्याशी अधिक चांगल्याप्रकारे बंध जुळवू शकतील आणि त्यांची जोखीमयुक्त वर्तनाची समस्या टळेल.

या पंधरा वर्षाच्या मुलाला तुम्ही शिक्षण चालू ठेवण्यास सांगितले पाहिजे आणि शाळेच्या प्रगतीकडे तुम्ही लक्ष दिले पाहिजे. त्याला पुस्तके देणे गणवेश देणे आणि शिक्षणास प्रोत्साहन देणे ही देखील एक चांगली समाजसेवा होऊ शकेल.

**प्रश्न (६)**

### माझ्या घरी काम करणाऱ्या बाई त्यांच्या दहा वर्षाच्या मुलीला शाळेत पाठवत नाहीत. मुलांना शिक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे व मुलांना शिक्षण देण्याचे महत्त्व काय हे मी त्यांना कसे समजावून सांगू?

शिक्षणाचा हक्क २००९ या कायद्यान्वये सहा ते चौदा वर्षाच्या मुलांना जवळच्या शासकीय अथवा खाजगी शाळेत मोफत शिक्षण मिळणे अनिवार्य आहे व हा त्यांचा हक्क आहे. प्रत्येक शाळेने शिक्षणाचा हक्क या कायद्याखाली मुलांना प्रवेश देणे बंधनकारक आहे व हा खर्च शासनातर्फे शाळेस परत मिळतो.

तुम्ही या मुलांना, विशेषतः मुलींना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे व तिच्या उत्कर्षाकरिता शासनाच्या विविध योजनांची माहिती त्यांना द्या

तुम्ही जर मुलीला शाळेत पाठविले नाही तर तुमच्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते हे मुलीच्या आईला समजावून सांगा. पण हे महत्त्व अत्यंत चतुराईने सांगावयास हवे, नाही तर ही व्यक्ती मुलीला शाळेत घालण्यापेक्षा तुमची नोकरी सोडणे जास्त पसंत करेल.

तुमच्या भागात असलेल्या अशासकीय सामाजिक संघटना, अंगणवाडी, आशासेविका, बालकल्याण संस्था व इतर सामाजिक संस्था त्या मुलीला शिक्षण देण्याकरता मदत व प्रोत्साहन देऊ शकतील. त्यांची मदत घ्या शाळेत गेल्यानंतर मध्यंतरातील जेवण, पुस्तके, गणवेश व मुलगी असल्यास सायकल तसेच इतर गोष्टी मोफत मिळतील हे त्या मुलीला व तिच्या आईला समजावून सांगा.

**प्रश्न (७)**

### आम्ही एका हॉटेलमध्ये जेवणास गेलो असताना तेथे एक तेरा चौदा वर्षाचा मुलगा काम करत होता. या करता आम्ही आमची नाराजी व्यक्त करावी का? हा बालकामगारच असेल ना? आमच्याविरुद्ध काय कारवाई होऊ शकते?

वय वर्षे १४ वर्षाखालील मुलांना ढाबा व हॉटेल खानावळीमध्ये काम करण्यास मनाई आहे. बालकामगार कायद्याविरुद्ध हे काम आहे. एक सुजाण नागरिक म्हणून हा प्रश्न तुम्ही खालील पद्धतीने हाताळू शकता

- तेथील व्यवस्थापकाला बालकामगार कायद्याबद्दल प्रशिक्षण द्या वयातील कायदेशीर बाबींची सविस्तर माहिती सांगा. याने प्रश्न सुटेल. पण कदाचित उलटे होऊन या हॉटेलचा मालक तुमच्याशी भांडेल, कदाचित त्या मालकांची ओळखीचे गुंड तुम्हाला त्रासही देतील, त्या हॉटेलमधला काम करणारा मुलगा त्याच्या कुटुंबाला काम करून मदत करत असेल तर तो मुलगादेखील तुमच्याशी भांडेल.
- त्या हॉटेलमध्ये काहीही न करता बाल कामगार व बालहक्कासंबंधी काम करणाऱ्या एखाद्या सामाजिक संस्थेची मदत घ्या. त्यांना हे सर्व सांगा त्यांच्याकडे असलेल्या संसाधनांच्या मदतीने आणि त्यांच्याकडे असलेल्या वेळेमुळे ते या गोष्टीचा अधिक चांगल्या प्रकारे पाठपुरावा करू शकतील व मुलाला न्याय मिळवून देऊ शकतील. तुमचे सुजाण नागरिक म्हणून कर्तव्य तर होईलच शिवाय हॉटेल मालकाने निर्माण केलेल्या कुठल्याही समस्येला तुम्हाला तोंड द्यावे लागणार नाही
- पर्याय म्हणून चाइल्ड हेल्पलाइन / या विषयात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांशी संपर्क साधा किंवा स्थानिक पोलीस स्टेशन, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा न्याय अधिकारी किंवा चाइल्ड हेल्पलाइनशी (फोन क्र. १०९८) गुप्तता पाळून ही तक्रार करा.

## प्रश्न (८)

### आमच्या घरी काम करणाऱ्या बाई तिच्या नऊ-दहा वर्षाच्या मुलीला त्यांच्याबरोबर घरी आणतात व ती मुलगी आईला घर कामात मदत करते. त्या मुलीला बालकामगार म्हणता येईल का? आम्ही या कामास परवानगी द्यावी का? कृपया सल्ला द्या.

बालकामगार कायद्याप्रमाणे कुठल्याही चौदा वर्षाखालील बालकाला तुमच्या घरी काम करण्याची परवानगी देऊ नये आणि त्यांना शाळेत दाखल करावे. www.labour.gov.in या वेबसाईटवर या कायद्याची सविस्तर माहिती मिळते. तुमच्या घरी काम करणाऱ्या बाईना या मुलीला घरी कामाकरता आणू नकोस' अशी सक्त ताकीद द्यावी. तिला क्वचित कधीतरी घरी खेळण्यास येऊ देण्यास हरकत नाही, पण कामाकरता मुळीच नाही. ज्या बाईंना तुम्ही कामाचा पगार देत आहात अशा बाईच्या मुलीने तुमच्या घरी काम करणे ही कायद्याप्रमाणे बालमजुरी आहे. लक्षात ठेवा, बालमजुराने काम करणे ही नोकरी देणाऱ्याची जबाबदारी आहे व याकरता असे काम देणाऱ्यास सहा महिन्याची कैद किंवा रु. २०,००० ते रु. २५,००० दंड किंवा दोन्ही होऊ शकते.

यामध्ये दोन महत्त्वाच्या समस्या आहेत :

१. ही बालमजूर आहे.
२. ही मुलगी तिच्या शिक्षणाच्या हक्कापासून वंचित आहे. तिच्या आईला या मुलीने या वयात काम करण्याचे धोके, मुलींची शारिरिक वाढ, मानसिक स्वास्थ्य इत्यादीबद्दल सविस्तर सांगा. या बाईची तिच्या मुलीबद्दलच्या शिक्षणाची मानसिकता बदलण्याकरता मदत करा आणि मुलीच्या उत्कर्षाकरता ज्या काही शासकीय योजना आहेत त्याची माहिती द्या.

## प्रश्न (९)

### आमच्या घरी घर दुरुस्ती/नूतनीकरण करणाऱ्या एका कंत्राटदाराने एका पंधरा वर्षाच्या मुलाला काम दिले आहे. त्या व्यक्तीला आमच्या घरी असे काम करण्याची परवानगी देणे म्हणजे बालमजुरीस चालना देणे म्हणता येईल का? कृपया मार्गदर्शन करा.

बांधकाम करणे हे धोकादायक काम आहे. यामुळे या मुलाने हे काम करणे याला बालमजुरी म्हणता येईल. बालकामगार कायद्याची कंत्राटदाराशी चर्चा करून कंत्राटदाराला वयाकिशोरवयीन मुलालादेखील कल्पना द्या. कदाचित ते या कायद्याविषयी अनभिज्ञ असतील किंवा निष्काळजी असतील. कुणीही तक्रार केली तर तुम्ही अडचणीत याल याची स्पष्ट कल्पना त्यांना द्या.

त्या कंत्राटदाराला हे देखील सांगा की त्याने बालमजूर कामावर आणले तर त्यालाही नूतनीकरणाचे काम देता येणार नाही. त्यामुळे त्याने प्रौढ कामगारच कामावर आणणे आवश्यक आहे.

तुम्ही चाईल्ड हेल्प लाइनला (फोन नंबर १०९८) गुप्तपणे फोन करून तक्रार करून ही माहिती द्या. त्यामुळे तो कंत्राटदार असे बालकामगार इतरत्र ठेवणार नाही. आम्ही गुप्तपणे फोन करण्यास याकरता सांगत आहोत की तुम्ही जरी सुजाण नागरिक असाल तरी या तक्रारीचा बदला घेण्याकरता कंत्राटदाराचे गुंड लोक पुढे येतील व तुम्ही अडचणीत याल. तुम्ही तुमच्या भागात कार्यरत असणाऱ्या व मुलांचे हक्क, बालमजुरीबद्दल काम करणाऱ्या एखाद्या अशासकीय सामाजिक संस्थेची मदत घ्या. यामुळे या मुलाचे शैक्षणिक पुनर्वसनही करता येईल.

प्रश्न
(१०)

**गेल्या काही दिवसात आमच्या परिसरात एक साधारण पंधरा वर्षाचा मुलगा कचऱ्याचे डबे गोळा करण्याचे काम करतो. हा बाल कामगार आहे का आणि आम्ही आमची नाराजी व्यक्त करावी का?**

१४ वर्षाच्या खालील मुलांनादेखील त्याच्या/तिच्या कुटुंबाच्या कामात मदत करता येते. पण ते काम हानिकारक असता कामा नये, या कामाचा त्याच्या शिक्षणावर परिणाम होऊ नये आणि दुसऱ्या मजुरांच्या बदल्यात त्याने काम करू नये.

या प्रश्नातील मुलगा हा १४ वर्षाच्या वर आहे त्यामुळे याला बालमजुरी म्हणता येणार नाही. याबरोबरच तो आपल्या कुटुंबाला मदत करीत आहे. कचरा गोळा करणे हे हानिकारक काम आहे आणि त्यामुळे किशोरवयीन मुलांनी हे काम करणे योग्य नाही. पण या केसमध्ये हा मुलगा कचरा गोळा करीत नाही तर कचऱ्याचे डबे, पिशव्या गोळा करीत आहे. जो पर्यंत त्याचे शिक्षण चालू आहे तोपर्यंत तरी तुम्ही तुमची नाराजी व्यक्त करू नये. पण या कामाचा परिणाम त्याच्या शाळेवर अथवा शिक्षणावर होत असेल तर मात्र तुम्ही तुमची नाराजी व्यक्त करून त्याच्या पालकांना तुम्ही बालकांच्या शिक्षणाचा हक्क व शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगावे. त्याचे वय निश्चितपणे तपासून पहावे आणि त्या मुलास बालकामगार कायदा सांगून प्राधान्याने शिक्षण पूर्ण करण्यास सांगावे.

त्या मुलाच्या कामाची प्रशंसा करून, त्याच्या शाळेची शुल्क भरून, त्याच पुस्तके देऊन तुम्ही एक चांगले सामाजिक कार्यदेखील करू शकता.